जनवाचन आंदोलन
बालपुस्तकमाला

आवडणार नाही का तुम्हाला
पुस्तकांचं बोलणं ऐकायला?

पुस्तकांना तुम्हाला काही सांगायचंय
त्यांना तुमच्या जवळ रहायचंय
पुस्तकांमध्ये चिमण्या चिवचिवतात
पुस्तकांमध्ये हिरवी शेतं डुलतात
पुस्तकांत झऱ्यांचं पाणी गुणगुणतं
अन् पऱ्यांच्या कथा कुजबुजतात
पुस्तकांत अग्निबाणाचं रहस्य असतं
पुस्तकांत विज्ञान बोलत असतं
पुस्तकांचं जग केवढंतरी मोठं आहे
पुस्तकांमध्ये ज्ञानाची लयलूट आहे

आवडणार नाही का तुम्हाला
त्या जगात भटकायला?
पुस्तकांना तुम्हाला काही सांगायचंय
त्यांना तुमच्या जवळ रहायचंय

-सफदर हाश्मी

मूल्य रु. ६.००

भारत
ज्ञान विज्ञान
समुदाय

भारत
ज्ञान विज्ञान
समुदाय



# फुग्याचा तो दिवस

लेखक जेम्स ए. स्मिथ
हिन्दी अनुवाद अरविंद गुप्ता
मराठी अनुवाद अर्चना विद्वांस

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समितीतर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित.

या प्रकाशनांचा उद्देश लोकांमध्ये आणि मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणं हा आहे.

पुस्तकाचे नाव : फुग्याचा तो एक दिवस
लेखक : जेम्स ए. स्मिथ
हिन्दी अनुवाद : अरविंद गुप्ता
मराठी अनुवाद : अर्चना विद्वांस
संपादन : विनया देशपांडे
चित्रकार : पंकज
निर्मिती सहाय्य:दिनानाथ मनोहर

जवाआं ५२ / बाल - ६
प्रकाशन : जून २००१

मूल्य : ६ रुपये

© सर्वाधिकार भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)

प्रकाशक : दत्ता देसाई
राज्य सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ,
पुणे-४११०३०. फोन : ०२०-४४५६६९४
मुद्रणस्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे-४११००४.

अक्षर जुळणी : गणेश कांबळे

# फुग्याचा तो दिवस

स्लीपी होलो नावाचं एक शहर होतं. डोंगराच्या कुशीत वसलेलं. या स्लीपी होलो गावात होमर नावाचा मुलगा त्याच्या हेन्रीमामाबरोबर एका जुन्यापुराण्या घरात रहायचा.

दिवसभर मामाबरोबर शेतातलं काम आणि नंतर इतर बारीकसारीक कामं करण्यात होमरचा दिवस संपायचा. पण एकदा का संध्याकाळ झाली की जेवणं करून होमर मामाबरोबर व्हरांड्यामध्ये बसून आपल्या सगळ्यात आवडत्या उद्योगाला लागायचा.



त्याला फुगे, साबणाचे फुगे बनवायला खूप खूप आवडायचं. त्याचे फुगे साधेसुधे, नेहमीसारखे नसायचे. मोठ्ठे फुगे

बनवण्यासाठी होमर कितीतरी दिवस प्रयत्न करत होता. त्यानं बनवलेले साबणाचे फुगे इतके मजबूत असायचे की ते चटकन फुटायचे नाहीत.

होमर फुगे बनवण्यासाठी नुसतं साबणाचं पाणी न घेता, एक खास 'सोल्युशन' म्हणजे एक खास रसायन तयार करायचा.



बरेच जण फक्त साबणाचं पाणी वापरतात. पण होमर एक वैज्ञानिक होता. सतत तो वेगवेगळी रसायनं करून पहायचा, त्यांचे फुगे करायचा. जास्त वेळ टिकणारे फुगे बनवण्याच्या प्रयत्नात तो सतत रहायचा.

त्यानं खूप प्रयोग केले. पहिल्यांदा त्यानं साबणाच्या पाण्यात थोडा डिंक मिसळला. पण ते मिश्रण थोडं दाट झालं. मग रात्री त्याच्या मनात विचार आला आणि त्या डिंकाच्या मिश्रणात



थोडं रॉकेल ओतून ते मिश्रण त्यानं पातळ केलं. पहिल्यापेक्षा ते खूपच चांगलं झालं. एका रात्री त्यानं साबणाची पावडर मिसळून पाहिली. त्यावेळी त्याचा फुगा तीन फूट लांब फुगला आणि पाच मिनिटं टिकला. शेवटी हेन्रीमामाच्या नाकावर जाऊन तो फुटला.

आता होमरचा उत्साह आणखी वाढला. त्यानं विचार केला की यात थोडा शाम्पू मिसळला तर आणखी चांगले फुगे होतील. शाम्पू मिसळल्यावर फुगे खरंच जास्त गोलमटोल झाले. मग त्यानं त्या रसायनात थोडं रबर सिमेंट आणि थोडा पाक मिसळला. यामुळे फुगे जास्त मोठ्ठे आणि टिकाऊ बनायला लागले. का कुणास ठाऊक या सगळ्या प्रयोगात बनणारे फुगे नेहमी हेन्रीमामावर जाऊन आदळायचे आणि फुटायचे. हेन्रीमामा जाम वैतागायचा आणि म्हणायचा, 'होमर, या फुग्यांमुळे एक दिवस गडबड होणारेय. चांगला अडचणीत सापडशील या फुग्यांमुळे. साबणाचे फुगे इतके मोठ्ठे होणं आणि इतका वेळ टिकणं हे काही नैसर्गिक नाही.'

पण होमर पडला वैज्ञानिक. त्याला हे सगळं ऐकायला सवड कुठं होती? तो आपला रात्रंदिवस नवनवीन प्रयोग करण्यात मश्गुल असायचा. एकदा रात्रीची जेवणं करून नेहमीप्रमाणे होमर आणि त्याचा हेन्रीमामा टेकडीवरच्या त्यांच्या घराच्या व्हरांड्यामध्ये बसले होते.



होमरने नुकतचं बरंच कायकाय मिसळून फुग्यांसाठी एक नवं रसायन तयार केलं होतं. यावेळी त्यानं त्या रसायनात थोडं डांबर घातलं होतं. रस्त्याकडेला त्याला डांबर सापडलं. 'बघूयात घालून काय होतं ते' असं म्हणून होमरनं ते डांबर फुग्याच्या रसायनात मिसळलं.

हेन्रीमामानं आपला तंबाखूचा पाईप पेटवला. त्याने एक मोठा झुरका घेतला आणि होमरकडे पाहून तो म्हणाला, 'होमर या फुग्यांमुळे एक दिवस गडबड होणारेय. चांगला अडचणीत सापडशील या फुग्यांमुळे. साबणाचे फुगे इतके मोठ्ठे होणं आणि इतका वेळ टिकणं हे काही स्वाभाविक नाही.'

होमर तर होता एक वैज्ञानिक. त्याला तर हे प्रयोग करण्यातच मजा वाटायची. मामा काय म्हणतोय ते न ऐकताच तो धावत घरात गेला आणि फुगे बनवायची त्याची सगळ्यात



आवडती नळी घेऊन आला. नळीने त्यानं ते रसायन ढवळलं आणि फुगा फुगवायला सुरवात केली.

पहिल्यांदा फुगवताना खूप जोर लावायला लागला. होमरचे दोन्ही गाल लाल लाल झाले. मग हळूहळू फुगा फुगत गेला आणि मग फुगा फुगवणं सोपंही झालं. होमरनं एक मोठ्ठा, पोट भरून श्वास घेतला आणि जोरात फुंकर मारली. फुगा मोठा झाला. आणखीन मोठ्ठा झाला. थोड्याच वेळात फुगा टम्म फुगला. होमरने आत्तापर्यंत बनवलेल्या फुग्यातला हा सर्वात मोठ्ठा फुगा होता. आणि तो फुगा आणखीनच फुगत चालला होता. होमरला तर आता टेकडीवरून एरवी दिसणारी शहरातली घरंही दिसेनाशी झाली. गावाबाहेरचं मैदानही दिसत नव्हतं. इतकंच काय हेन्रीमामापण आता दिसत नव्हता.



त्याच्या कानावर हेन्रीमामाचे शब्द मात्र येत होते, 'होमर तू बघच. एक दिवस चांगला अडचणीत सापडशील या फुग्यांमुळे. हे काही स्वाभाविक नाही...!'

आता होमरला काही ऐकू येत नव्हतं. फुगा इतका मोठा झाला होता की तो जमिनीला टेकला होता. होमर फुगा जमिनींवर घासून फुटू नये म्हणून प्रयत्न करत होता. पण तरीसुद्धा होमर एकीकडे जोरजोरात फुंकर मारत होताच. त्यामुळे अर्थातच फुगा मोठ्ठा, आणखीन मोठ्ठा होत होता.



होमर अगदी सावकाश व्हरांड्याच्या कडेला येऊन उभा राहिला. त्यामुळे फुग्याला लटकायला जागा मिळाली. दहा फूट, अकरा फूट, बारा फूट...फुगा आणखी फुगत होता. तेरा फूट, चौदा फूट... आणि होमरच्या कानावर हेन्रीमामाचे शब्द



आले 'बापरे !' आणि तेवढ्यात एक जोरदार धमाका झाला आणि त्याबरोबर तो फुगा फुंकायच्या नळीपासून सुटला. थोडा वेळ फुगा थरथरला, हलला पण फुटला नाही. फुटायच्या ऐवजी फुगा गोलगोल चाकासारखा फिरायला लागला. पहिल्यांदा हळूहळू फिरत होता. पण टेकडीच्या उतारामुळे त्याचा वेग वाढला. आत्तापर्यंत हेन्रीमामा उठून उभा राह्यला होता आणि म्हणत होता, 'होमर मी तुला आधीच सांगितलं होतं, एक ना एक दिवस...!' पण आता होमरला काहीही ऐकू येत नव्हतं. तो टेकडीवरून खाली जाणाऱ्या आपल्या भल्यामोठ्या फुग्याच्यामागे पळत होता.

तिकडे टेकडीवर काळी गाय गवत खात होती. तिला फुगा आपल्याकडे येतोय दिसल्यावर ती जोरात हंबरली 'हम्मा...!' पण तेवढ्यात फुगा तिला जाऊन धडकला. फुगा इतका चिकट होता की काळी गाय त्यात लपेटली गेली.





फुगा घरंगळतच होता. छोटा टॉम हेन्रीमामासाठी अंडी घेऊन चालला होता. त्याला समोरून फुगा येताना दिसला. तो 'वाचवा' म्हणायच्या आतच फुग्यात लपेटला गेला. फुगा टेकडीच्या उतारावरून जोरात गडगडत स्लीपी होलो शहराच्या दिशेने चालला होता.

टॉमच्या मागेमागे त्याची भुऱ्या रंगाची मांजरही येत होती. ती पण एका सेकंदात फुग्यात लपेटली गेली आणि शहराच्या दिशेने गडगडायला लागली. फुग्याच्या मागे होमर पळत होता आणि होमरच्या मागे पळत होता हेन्रीमामा, 'होमर मी तुला आधीच सांगितलं होतं, एक ना एक दिवस...!'

थोड्याच वेळात फुगा हायवेवर म्हणजे मुख्य रस्त्यावर आला. मुख्य रस्त्यावरून मिस्टर जिम शहरात भाजी विकून



घोडागाडीतून मोठ्या ऐटीत परत चालले होते. दिवसभराच्या थकव्याने त्यांना पेंग येत होती. त्यांच्या घोड्यालाही घराचा रस्ता एकदम कंटाळवाणा वाटत होता. त्यांना काही कल्पना यायच्या आत मिस्टर जिम, त्यांचा घोडा, गाडी सगळे फुग्यात लपेटले गेले. आणि ही सगळी वरात शहरातल्या मुख्य रस्त्याकडे गडगडायला लागली.

थोड्याच वेळात घोडा खिंकाळायला लागला, मांजर ओरडायला लागली, गाय हंबरायला लागली, छोटा टॉम किंचाळायला लागला आणि मिस्टर जिम 'वाचवा, वाचवा' असं ओरडायला लागले.



एवढा आवाज कुठून येतोय ते पहायला शहरातले सगळे लोक मुख्य रस्त्यावर आले. आणि समोरचं दृश्य पाहून हैराण झाले. रस्त्यावर एक महाकाय फुगा जोरात गडगडत होता आणि तमाम जनावरं हातापायासकट त्यावर चिकटलेली होती. लोक

पळत जाऊन कुठतरी लपायच्या आत फुगा त्यांना जाऊन धडकला.

सगळ्यात पहिल्यांदा डॉक्टर साहेबांच्या दवाखान्यासमोरची मोटारगाडी फुग्यात लपेटली गेली. नंतर मिसेस जोन्स, ज्या खरंतर पार्कमध्ये बाकावर बसून विणकाम करत होत्या. काही मुली रस्त्याच्या एका कोपऱ्यावर टिक्कर खेळत होत्या त्याही गायब झाल्या.

दोन कुत्रे आपापसात खेळत होते, ते पण पाहतापाहता फुग्यात गुंडाळले गेले. रस्त्यावरची जी जी गोष्ट जमिनीला चिकटलेली नव्हती ती लवकरच फुग्याला चिकटत होती.

आता होमर आणि हेन्रीमामापण इकडे येऊन पोचले होते. दोघंही डोळे विस्फारून फुग्याच्या रस्त्यात येणारी प्रत्येक वस्तू फुग्याला चिकटताना पहात होते.





'हेन्रीमामा, हेन्रीमामा' होमर ओरडला, 'आता मी काय करू ? या फुग्याला कसं थांबवू ?'

आणि हेन्रीमामाने पुन्हा तेच वाक्य ऐकवलं जे तो आधी कितीतरी वेळा म्हणाला होता, 'होमर मी तुला आधीच सांगितलं होतं, एक ना एक दिवस...!'

मुख्य रस्ता जिथं संपत होता तिथं एक चर्च होतं. शहरातल्या सगळ्या लोकांना गावातल्या चर्चचा अभिमान वाटायचा कारण चर्चच्या छतावर एक लांब आणि टोकदार भाला लावलेला होता. आता ज्याच्यावर खूप लोक, जनावरं, वस्तू चिकटलेल्या होत्या तो फुगा चर्चच्या दिशेने जात होता.

होमर रडत म्हणाला, 'आता हे सगळे लोक मरतील आणि मला पाप लागेल. सगळी चूक माझीच आहे.'



फुग्याचा वेग आता इतका वाढला होता की तो जवळजवळ उड्या मारत पुढे येत होता. फुग्यातून अत्यंत भयानक आवाज येत होते. सगळेजण किंचाळत होते, जनावर रेकत होती. चर्चच्या जवळ यायच्या आधी फुगा एकदम उडला आणि चर्चच्या छतावरच्या टोकदार भाल्याला जाऊन धडकला. एक क्षणभर फुगा तसाच होता. नंतर फुगा फुटला व त्यातली होमरने भरलेली सगळी हवा फुस्स करून बाहेर पडली. मग फुग्यातनं काय काय बाहेर पडलं. लोकं, मोटारगाड्या, जनावरं, घोडागाडी, बाकडी, अंडी, लोकर, आणि न जाणो काय काय. बाप रे बाप! सगळ्या वस्तू डिंकासारख्या चिकट मिश्रणात लडबडल्या होत्या.





होमरच्या फुग्याच्या या चिखलाला साफ करायला सगळ्या गावाला चार आठवडे लागले. अशी घटना गावात आधी कधी घडलीच नव्हती. नंतर एक वर्षभर तरी लोक आपल्या कानात किंवा केसात अडकलेल्या होमरच्या प्रयोगाला रगडून रगडून धूत होते. फुग्याचा तो दिवस स्लीपी होलोमधले लोक कधीही विसरले नाहीत.

शहराला धोका निर्माण न करता होमरला त्याचे वैज्ञानिक प्रयोग करता यावेत आणि शोध लावता यावेत म्हणून लोकांनी होमरला वैज्ञानिक साधनं देऊन कॉलेजला पाठवलं. हेन्रीमामाला होमरची खूप आठवण यायची. रोज रात्री जेवण झाल्यावर तो व्हरांड्यामध्ये बसून आपला तंबाखूचा पाईप शिलगावत असे आणि म्हणे, 'होमर, मला माहीत होतं एक ना एक दिवस तुझ्या वैज्ञानिक प्रयोगामुळेच तू काहीतरी कमाल करून दाखवशील!'